**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर**

ग्राहक तक्रार क्र. २३४–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. मलकाप्पा रेवाप्पा तेली,<br>मु. पो. सोन्याळ, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :–
१) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. मलकाप्पा रेवाप्पा तेली, मु.पो. सोन्याळ, ता. जत, जि. सांगली यांनी रजिस्टर पोष्टाने मंचामध्ये अनुसूचि अ मध्ये दि. ४.१०.२०१० ला तक्रार दाखल केली. त्यामध्ये नवीन शेती पंपास वीज कनेक्शन मिळावे अशी वि.प.च्या उप विभागाकडे मागणी केली, परंतु अद्याप कनेक्शन मिळाले नाही.

कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार वीज कनेक्शन मिळावे व विलंबापोटी भरपाई मिळावी अशी मंचाकडे विनंती केली. तत्पूर्वी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. ५.३.२०१० रोजी अर्ज केला व दि. ३०.४.२०१० ला रु. ५०००/– फी भरली. अंतर्गत कक्षाचा दि. ८.३.२०१० ला आदेश झाला.

वितरण कंपनीने आपल्या दि. ९.११.२०११ च्या लेखी अहवालात ग्राहकाने दि. १३.४.२०१० ला अर्ज दिल्याचे म्हटले आहे.. त्यांना दि. २०.४.२०१० ला चलन देण्यात आले आहे. चाचणी अहवाल दि. २५.९.२०१० ला प्राप्त झाला आहे. ग्राहकाला दि. ५.१०.२०१० ला वीज कनेक्शन देण्यात आले आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. १०.११.२०१० ला सुनावणीस घेतली असतां, तक्रारदार गैरहजर. वि.प.तर्फे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर व श्री. मैंलापुरे, कनिष्ठ अभियंता, श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता उपस्थित. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, ग्राहकाने दि. २५.९.२०१० ला चाचणी अहवाल दिला त्यानुसार त्यांना दि. ५.१०.२०१० ला कनेक्शन देण्यात आले. त्यांचे म्हणण्यानुसार १० दिवसांचा विलंब झालेला आहे. वि.प.ने तक्रारदाराच्या अर्जाच्या तारखेबाबत खुलासा मंचासमोर केला नाही. मंचाचे सदस्य सचिव यांनी श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग यांच्याशी फोनवरुन चर्चा केल्याचे दिसते. अशा परिस्थितीत अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रांची बारकाईने पडताळणी केली असतां, अर्जदाराचा स्वत:चाच गोंधळ झाल्याचे दिसते. अर्जदाराने दि. ३०.४.२०१० ला रु.५०००/– भरल्याच्या पावतीची झेरॉक्स जोडली आहे परंतु त्याचा तक्रारीत उल्लेख केलेला नाही. अंतर्गत कक्षाकडे दि. ५.३.२०१० ला तक्रार दाखल केली आहे व कक्षाचा आदेश दि. ८.३.२०१० ला झाल्याचे दिसते. परंतु हे निश्चित की दि. २५.९.२०१० ला ग्राहकाने चाचणी अहवाल दिलेला आहे व संयुक्त पाहणी अहवालानुसार टेस्ट रिपोर्ट स्विकारल्याचे अनुमान काढावे लागेल, कारण त्यावरुन वि.प.ने वाद उत्पन्न केलेला नाही. वि.प.ने तक्रारदारास दि. ५.१०.२०१० ला वीज कनेक्शन दिले आहे. वि.प.ने १० दिवसांच्या विलंबाबाबत कुठलाही खुलासा केलेला नाही. त्यामुळे २ आठवड्यांच्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. २००/– भरपाई मिळण्यास ग्राहक हक्कदार आहे व ती देण्याची वि.प.ची जबाबदारी आहे. खालील प्रमाणे आदेश.

## आदेश

१) तक्रार अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२) वि.प.ने तक्रारदार यांस २ आठवड्यांच्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. २००/– भरपाई द्यावी. सदर रकमेचे समायोजन वीज बिलातून करण्यात यावे.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )

अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.